# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/ १४३ दिनांक : ३१ जानेवारी, २००६

विषय : **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दि. २५ जानेवारी, २००६ रोजी झालेल्या १०२ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २५ जानेवारी, २००६ रोजी दूपारी २.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०२ व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावीं, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

( माधव दोमकोंडवार )
सदस्य सचिव

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग**

**मा. मंत्री,**
**ग्रा.वि., पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

TCM-45

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०२ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०२ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जानेवारी, २००६ दूपारी २.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा. राजेश टोपे, राज्यमंत्री, नगरविकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री. माधव दोमकोंडवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. हेमंत लांडगे, विशेष कार्य अधिकारी, पापुवस्ववि, मंत्रालय व मुख्य अभियता, मजीप्रा, मुंबई.
२. डॉ. संजय दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे.
४. श्री. सागर रानडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., औरंगाबाद.
५. श्री. जयंत देशपांडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
६. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. बी. एस. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. श्री. वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे.
९. श्री. एस. पी. भातखंडे, मुख्य प्रशासकिय अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
१०. श्री. अनिल मुळे, मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०१व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक १९ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या १०१ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

---

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०१व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

मजीप्राच्या १०१ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास माहिती करुन दिली. सर्वसाधारण चर्चेनंतर याबाबीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : गोरेगाव व १५ गावे (ता. गोरेगाव, जि. गोंदिया) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कंत्राटी उद्योजकाव्दारे करणेबाबत व त्याच धर्तीवर इतर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची कार्यवाही करुन म.जी.प्रा.च्या पुनर्रचनेचे प्रथम पाऊल टाकण्याबाबत..**

अअ(समन्वय)

सदर बाब मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळापुढे सविस्तरपणे मांडली. ही योजना म.जी.प्रा.ने चालविल्यास अशाप्रकारच्या सार्वजनिक नळखांबे न घेता स्वेच्छेने जोडणी घेऊन राबवता येण्यासारख्या इतर योजनांची देखभाल व दुरूस्तीची कामेही म.जी.प्रा. करेल व म.जी.प्रा.च्या पुढील भविष्याच्या वाटचालीच्या दृष्टीतून धोरणात्मक बाब म्हणून यास मान्यता देण्याची सदस्य सचिव यांनी विनंती केली. सर्वसाधारण चर्चेनंतर सदर बाबीस मान्यता देण्यात आली. सदर योजनेची २५ वर्षाची देखभाल व दुरूस्तीसाठी आवश्यक तो करारनामा म.जी.प्रा. व जिल्हापरिषदे दरम्यान करण्यात यावा, त्याचप्रमाणे सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निविदेचे प्रारुप तयार करुन CRISIL/ FIRE/ IL&FS/ IDFC संस्थेकडून तपासून घ्यावे व तद्नंतर मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांचेशी चर्चा करुन मॉडेल निविदा मंजूर करावी असे ठरले. ही योजना म.जी.प्रा.मार्फत चालविताना जर पहिल्या ५ वर्षात जी आर्थिक तुट येईल ती तुट भरुन काढण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते आर्थिक सहाय्य घेण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच शासनाकडून प्रादेशिक पाणी पुरवठा चालविण्याकरता संबंधित जिल्हा परिषदांना जे आर्थिक सहाय्य देण्यात येते तशा प्रकाराचे आर्थिक सहाय्य या योजनेकरिता शासनाकडून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

दिनांक १०.८.२००५ च्या शासन निर्णयाने सर्वच योजना मजीप्राने राबवावयाच्या आहेत असा गैरसमज सर्व जिल्हापरिषदांचा झाला असल्यामूळे त्या अनुषंगाने शासन निर्णयात आवश्यक त्या सूधारणा करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ४: लातूर शहर पाणी पुरवठा योजना (उद्‌भव ते वितरण व्यवस्था). दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी थेट ग्राहकापर्यंत पाणीपट्टी वसुलीसह नगर परिषद, लातूर यांचेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हस्तांतरीत करुन घेणेबाबत व नागरी योजनांच्या बाबतीत मजीप्राच्या पुनर्रचनेचे प्रथम पाऊल टाकणेबाबत..**

लातूर शहर पाणी पुरवठा योजना (उद्‌भव ते वितरण व्यवस्था) दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी थेट ग्राहकापर्यंत मीटरव्दारे पाणी पुरवठा करुन पाणीपट्टी वसुलीसह नगर परिषद, लातूर यांचेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ३० वर्षासाठी नगरपालिके बरोबर करारनामा करुन हस्तांतरीत करुन घेणे व कंत्राटदारामार्फत वसूलीसह राबविणे त्याचप्रमाणे प्रगतीपथावरील असलेल्या योजनेसाठी उपलब्ध करावयाचे रु. १७.७७ कोटी कर्ज मजीप्राने उभे करुन योजना पूर्ण करणे इत्यादीसाठी सादर केलेली बाब सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली. यावर चर्चा करताना नगरपालिकेने ESCROW A/c. मध्ये रु. ५० लक्ष प्रतिमाह भरण्याची रक्कम कमी करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, पा.पु. व स्व.वि. यांना राहतील या सूधारणेसह सदर बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ५: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्ती योजना लागू करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सदस्य सचिवांनी संचालक मंडळास अवगत केले. सर्वसाधारण चर्चेनुसार सदर बाबीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ६: प्रगतीपथावरील नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून नव्याने घ्यावयाचे कर्ज..**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. सद्य:स्थितीत एकूण १८ योजनांचे प्रस्ताव हुडकोकडे सादर केले असून त्यापैकी ४ प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांसाठीचे आहेत. याबाबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या पूर्ततेबाबतही अवगत करण्यात आले. सदर कर्ज उपलब्ध करुन घेण्यासाठी मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांचे स्तरावर हुडकोचे अधिकारी व सर्व संबंधितांची बैठक घेऊन कर्ज मंजूर करुन घेण्याची कार्यवाही करावी व तदनंतर शासनाने द्यावयाच्या हमी बाबत योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश मा. मंत्री, पा.पु.व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी दिले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने मांडलेल्या ठरावानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ७ नवीन योजनांसाठी रु. ३४९३.७५ लक्ष हुडको कर्ज घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी बारामती पाणी पुरवठा योजनेसाठी हुडकोचे कर्ज आवश्यक असल्याचे विषद केले. या योजनेसाठी हुडको कर्ज घेण्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र. ७: वाढीव देवळाली प्रवरा पाणी पुरवठा योजना, तालुका राहूरी, जिल्हा अहमदनगर, योजनेस कर्जापोटी इतर योजनेच्या स्त्रोतातून निधी वर्ग करुन देणेबाबत..**

वाढीव देवळाली प्रवरा पाणी पुरवठा योजना त्वरीत कार्यान्वित करता यावी याकरिता हुडकोकडून कर्ज मंजूर होईपर्यंतच्या कालावधीत संगमनेर पाणी पुरवठा योजनेवरील शिल्लक निधीतून रु. १५० लक्ष कर्जापोटी हुडकोच्याच अटी मात्र व्याज दरापेक्षा १% अधीक, २% हमी शुल्क दराने कर्ज म्हणून तात्पूरत्या स्वरुपात नगरपरिषदेस उपलब्ध करुन देणेबाबत मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी सविस्तरपणे संचालक मंडळास अवगत केले. त्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. याच धर्तीवर इतर योजनांचे बाबतीतही कार्यवाही आवश्यक असल्याचे सदस्य सचिवांनी अवगत केले असता त्यासाठीची कार्यक्रम बाब पुढील बैठकीत चर्चेस आणावी असे ठरले.

याबाबत मा. अध्यक्ष यांनी देवळाली नगरपरिषदेने संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानांतर्गत उल्लेखनीय कामगिरी केली आहे, त्यामुळे देवळाली प्रवरा योजनेसाठी विशेष बाब म्हणून कर्ज मंजूर करण्यास संमती दर्शविली. या अनुषंगाने केलेल्या ठरावास मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ८: चांदवडसह ४४ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जिल्हा नाशिक. मे.सागर इंडस्ट्रीज ॲन्ड डिस्टीलरीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ओद्योगिक दराने पाणी पुरवठा करणेबाबत..**

सदर योजनेतून काही गावांना तात्पूरत्या स्वरुपात पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे सदर योजनेवर वीज व पाटबंधारे विभागाच्या बिलापोटी महाराष्ट्र जीवन

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

प्राधिकरणास निधी उपलब्ध करुन द्यावा लागत आहे. सदर योजना पूर्ण होण्यास अद्यापही सुमारे एक ते दीड वर्ष इतका कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदर होणारा खर्च हा मे.सागर इंडस्ट्रीज अॅन्ड डिस्टीलरीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दरदिनी १० लक्ष लिटर्स पाणी ओद्योगिक दराने पुरवठा करुन येणाऱ्या पाणीपट्टीच्या रुपाने मिळणाऱ्या रकमेतून भागविता येणार आहे.

मे.सागर इंडस्ट्रीज अॅन्ड डिस्टीलरीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला या योजनेतून पाणी पुरवठा करण्यास शासनाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. त्यामुळे या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. मात्र सदर कंपनीकडून देखभाल दुरूस्तीच्या खर्चापोटी अनामत रक्कम म्हणून ३ महिने इतकी रक्कम आगाऊ घेण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. या अनुषंगाने केलेल्या ठरावास मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ९: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००४-०५ चे वार्षिक लेखे स्वीकृत होणेबाबत..**

विसमुलेअ

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २००४-०५ चा वार्षिक लेखा स्वीकृतीस्तव संचालक मंडळासमोर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. यांनी सादर केला. उपरोक्त वार्षिक लेख्यास म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १०: राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत..**

विसमुलेअ

दिनांक २४.११.२००४ ते दिनांक ३१.१२.२००५ या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला तात्पुरता शिल्लक निधी सुधारीत मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने वेगवेगळया बँकांमध्ये अल्प व दीर्घ मुदतीच्या केलेल्या गुंतवणूकीच्या अनुषंगाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. सर्वसाधारण चर्चेनंतर केलेल्या या गुंतवणूकीस मान्यता संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

**कार्यक्रम बाब क्र. ११: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या जागांचा "बांधा, वापरा व हस्तांतर करा" या तत्वावर विकास करणेबाबत..**

मुप्रअ

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या मोकळया व विना वापरात असलेल्या अंधरी व पनवेल येथील जागांचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करण्यासाठी नेमलेल्या समितीने म.जी.प्रा.स वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी सल्लागारांचे पॅनल नामिका परिविष्टतेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात आले होते. त्यानुसार ६ सल्लागारांकडून प्राप्त झालेल्या EOI पैकी बी. बी. असोसिएटस्, मुंबई व किर्लोस्कर कन्सल्टंट लि., पुणे यांचा अनुक्रमे अंधेरी व पनवेल येथील जागांसाठीचा देकार मंजूर करण्याबाबत सादर केलेल्या या बाबीचे विश्लेषण अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे यांनी संचालक मंडळासमोर विषद केले.

मात्र या प्रस्तावावर मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि., यांनी स्वत: अभ्यास करण्याचे नमूद करुन सदर बाब तूर्त प्रलंबित ठेवण्याचे निर्देश दिले, त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळात सार्वजनिक बांधकाम विभागात अशाच प्रकारची BOT तत्वावर काही कामे हाती घेतली असून त्या विभागामार्फत नेमकी कोणती कार्यपध्दती अवलंबिली जाते, याचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे उपरोक्त कार्यक्रम बाब स्थगित ठेवण्यात आली.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब १ :**

**सिल्लोड वाढीव पाणी पुरवठा योजनेवरील शिल्लक राहिलेले आयुर्विमा कर्ज सद्य:स्थितीला प्रगतीपथावर असलेल्या पुनर्रचित वाढीव सिल्लोड पाणी पुरवठा योजनेवर वळते करणे व अखर्चित कालावधीसाठीची कर्जावरील व्याज माफ करणे...**

वि.सप्रमुलेअ

सदर कार्यक्रम बाब मा. उपाध्यक्ष यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर असल्यामुळे व मा.उपाध्यक्ष काही कारणास्तव बैठकीस उपस्थित नसल्यामुळे विस्तृत चर्चेसाठी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब २ :**

**१७.५% या अस्तीत्वातील ई.टी.पी. च्या दरामध्ये वाढ न करता ई.टी.पी.ची सध्याची फोड (Break-up) बदलण्याबाबत..**

विसमुलेअ

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अस्तित्वातील ई.टी.पी. च्या फोड केलेल्या शिर्षाच्या टक्केवारीची सुधारीत फोड करण्यासाठीची सदरची कार्यक्रम बाब आहे. या बाबीमध्ये

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सद्यःस्थितीत शिर्षनिहाय होणाऱ्या खर्चाच्या आकडेवारीबाबतचे विवेचन मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर सादर केले. सदर विवेचनानुसार निवृत्त वेतनावर मंजूर टक्केवारीपेक्षा जादा रक्कम खर्च होत असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने इतर आवश्यक शिर्षावरही टक्केवारीचे प्रमाण कमी करुन सुधारीत टक्केवारी एकूण टक्केवारीमध्ये फरक न करता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय व उप-विभागीय कार्यालयाचा खर्च : | ९.५% |
| २) | मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता कार्यालयाचा खर्च : | १.५% |
| ३) | मध्यवर्ती कार्यालयाचा खर्च : | १.०% |
| ४) | निवृत्ती वेतनाचा खर्च : | ५.५% |

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे मुळ प्रस्तावातील आस्थापना, हत्यारे व सयंत्रे (ई.टी.पी.) या शब्द प्रयोगाऐवजी आस्थापना व निवृत्ती वेतन (ई. अॅन्ड पी.) म्हणजेच (Establishment & Pension) या शब्द प्रयोगाचा वापर करावयासही संचालक मंडळाने मान्यता दिली.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब ३ :**

**माथेरान (गिरीस्थान) पाणी पुरवठा योजनेतून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराच्या आढाव्याबाबत..**

माथेरान (गिरीस्थान) पाणी पुरवठा योजनेच्या पाणीपट्टीच्या संदर्भात दिनांक २८.१२.२००५ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत हॉटेल व्यावसायीकांसाठीचे दर कमी करणे, तलावाच्या पाण्याची गळती कमी करणे, इत्यादी बाबींवर चर्चा झाली. चर्चेमध्ये योजनेचा खर्च कसा कमी करता येईल त्याचप्रमाणे प्रचलित दराचे पुनःश्च पुनर्विलोकन करणे, ग्राहकांकडे असलेली थकबाकी वसूल करणे व थकबाकी भरणार नाहीत त्यांचेवर कारवाई करणे इत्यादी बाबींचा अभ्यास करुन कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्याचे निर्देश दिले होते. सदर बाब सदस्य सचिव यांनी विस्तृतपणे मांडली व माथेरान पाणी पुरवठा योजनेवरील व्यावसायीक हॉटेलचे दर कमी करणे शक्य नसल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. त्या अनुषंगाने चर्चा होऊन सर्व संमतीने माथेरान योजनेच्या पाणी पुरवठयाचे दर कमी न करण्याबाबतचा व पाणीपट्टी थकीत ठेवणाऱ्या ग्राहकांची नळ जोडणी खंडीत करण्याचा ठराव मान्य करण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

या पाणी पुरवठा केंद्राचा उद्भव असलेल्या तलावाची क्षमता वाढविण्यासाठीच्या दृष्टीने धरणाची उंची वाढविणे, तलावाची गळती कमी करणे त्याचप्रमाणे जुन्या खराब झालेल्या पाईपलाईनची दुरूस्ती अथवा पाईपलाईन बदलणे इत्यादीबाबतची कार्यवाही अथवा प्रस्ताव तातडीने तयार करुन शासनास सादर करावा असेही निर्देश मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी दिले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब ४ :**
**पंढरपूर नगरपरिषदेकडे असलेल्या थकबाकीबाबत..**

पंढरपूर पाणी पुरवठा योजना नगरपरिषदेला हस्तांतरण करण्यापूर्वी करण्यात येणारा ठोक पाणी पुरवठा ८०% घरगुती दराने व २०% बिगर घरगुती दराने अशी विभागणी करुन दर आकारण्यात येत होते. मात्र ही आकारणी नगरपरिषदेला मान्य नसल्यामुळे नगरपरिषद देयके प्राधिकरणाकडे भरत नव्हती. त्यावर तोडगा म्हणून शासनाने नगरपरिषदेस मान्य अशा श्री.छत्रे, निवृत्त अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., यांना लवाद म्हणून नेमण्यात आले. लवादाच्या निर्णयानुसार त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मजीप्राने कार्यवाही केली असून सद्यःस्थितीत दिनांक ३१ डिसेंबर, २००५ अखेर नगरपरिषदेकडे खालीलप्रमाणे थकबाकी दिसून येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पाणीपट्टी मूळ रक्कम : | रु. | ५३२.७६ लक्ष |
| २) | विलंब आकार : | रू. | ४५०.०० लक्ष |
| | **एकूण ..** | **रु.** | **९८२.७६ लक्ष** |

या अनुषंगाने सादर केलेल्या या कार्यक्रम बाबीवर चर्चा सुरू असताना सदर बैठकीस आमंत्रित केलेल्या नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीचे म्हणजेच मजीप्रास उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे विवेचन संचालक मंडळासमोर सादर केले. मात्र सदर आकडेवारी व मजीप्राची आकडेवारी यामध्ये बरीच तफावत दिसून आल्याने मा. अध्यक्ष महोदयांनी सदर बाबीची शहानिशा करण्यासाठी सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, मजीप्रा आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर यांनी एकत्र बसून आवश्यक ती कार्यवाही करुन सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(१०)

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब ५ :**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील पुणे लष्कर पाणी पुरवठा केंद्र, ४६३, स्टॅव्हले रोड, पुणे-१, येथील १६,७०२ चौ.मी. जमिनीचा "बांधा, वापरा व हस्तांतर करा" या तत्वावर विकास करण्याबाबत..**

मु५३१

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी संचालक मंडळासमोर आवश्यक त्या नकाशासह सदर प्रस्तावाचे सादरीकरण केले. यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.

१) पुणे महापालिकेकडून रस्ता रुंदीकरणासाठी विश्राम गृहाच्या झालेल्या नुकसानीपोटी रु.६.१३ लक्ष इतकी रक्कम स्वीकारण्यास मंजूरी देण्यात आली. त्याचप्रमाणे सदर जागेची मालकी तपासून घेऊन त्याच्या किंमतीबाबतची कार्यवाही प्रशासनाने करावी.

२) लष्कर पाणी पुरवठा केंद्राच्या ४६३, स्टॅव्हले रोड येथील मिळकतीपैकी १.६७ हेक्टर क्षेत्र मजीप्राच्या नावे लावणे तसेच या क्षेत्राचा एकत्रित विकास आराखडा स्पर्धात्मक पध्दतीने वास्तुविशारदांकडून करुन घेणे व तद्नंतर BOT तत्वावर विकास करण्याचा तांत्रिक तपशिल व प्रारुप निविदा तयार करणे या बाबीसाठी येणाऱ्या रु. १५ लक्ष खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

संचालक मंडळासमोर चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.

Board 100/102 Minutes

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.